वसई विरार शहर महानगरपालिका

“ज्येष्ठ नागरिक संघ अनुदान योजना”

या योजनेंतर्गत पात्र ज्येष्ठ नागरिक संघांना वर्षातून एकदाच वार्षिक अनुदान देण्यात येईल

पात्रतेच्या प्रमुख अटी

1. संस्था Societies Registration Act / Public Trust Act अंतर्गत नोंदणीकृत असावी.
2. संस्था किमान 3 वर्षांपासून कार्यरत असावी.
3. योजना हद्दीतील जेष्ठ नागरिकांसाठी असून त्यांचे कार्यालय सुद्धा महानगरपालिका हद्दीत असावे.
4. संस्थेने मागील 3 वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल सादर करावेत.
5. संस्थेत किमान 25 सदस्य असावेत.
6. संस्थेने मागील वर्षाचा सामाजिक / सांस्कृतिक उपक्रम राबविले बाबत अहवाल व फोटो सादर करावेत.
7. संस्थेच्या सभासद संख्या प्रमाणे अनुदान मर्यादा निश्चित केली जाईल
8. संस्थेला वर्षातून एकदाच वार्षिक अनुदान देण्यात येईल.

आवश्यक कागदपत्रे

1. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत
2. संस्थेचे पॅन कार्ड साक्षांकित प्रत
3. बँक पासबुकची साक्षांकित प्रत
4. सभासदांची सदस्य यादी
5. मागील 3 वर्षांचा ऑडिट रिपोर्ट
6. मागील वर्षाच्या सामाजिक/सांस्कृतिक उपक्रमांचा अहवाल व फोटो
7. विहित नमुन्यातील अर्ज.

योजनेची उद्दिष्टे

1. ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य संवर्धन करणे.
2. सामाजिक एकाकीपणा कमी करणे
3. सांस्कृतिक मानसिक कल्याणासाठी आवश्यक उपक्रमांना चालना देणे

अनुदानाचा उपयोग

1. आरोग्य शिबिरे / आरोग्य तपासणी शिबिरे
2. योग व व्यायाम साहित्य
3. वाचनालय साहित्य
4. सांस्कृतिक कार्यक्रम
5. ज्येष्ठ नागरिक मेळावे



वसई विरार शहर महानगरपालिका



ज्येष्ठ नागरिक संघ अनुदान योजना

ज्येष्ठ नागरिक संघाच्या सदस्य संख्ये प्रमाणे वार्षिक अनुदान

	सदस्य संख्या	वार्षिक अनुदान रक्कम
१	२५ ते ५०	रु.२५,०००/-
२	५१ ते १००	रु. ५०,०००/-
३	१०१ ते १५०	रु. ७५,०००/-
४	१५१ ते २००	रु. १,००,०००/-
५	२०० च्या वरील	रु. २,००,०००/-

प्रति,

……..

……..

……..

योजनेचेनाव :- " ज्येष्ठ नागरिक संघ अनुदान योजना "

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरिक संघाना वार्षिक अनुदान मिळणेबाबत.

महोदय,

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात …….. या नावाने आमची संस्था नोंदणीकृत असुन ……. या ठिकाणी सन ……. वर्षापासुन कार्यरत आहे. आमच्या संस्थेत …….. सभासद आहेत. आम्हाला आमच्या या संस्थेमार्फत आरोग्य शिबीरे / आरोग्य तपासणी शिबीरे, योग/व्यायाम साहित्य, वाचनालय साहित्य, सांस्कृतिक कार्यक्रम, ज्येष्ठ नागरिक मेळावे या कामकाजासाठी आम्हाला महानगरपालिके कडुन वार्षिक अनुदान मिळावे. यासाठी आम्ही यासोबत खालील कागदपत्रे सादर करीत आहोत.

१. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत
२. संस्थेच्या सदस्यांची यादी
३. संस्था सन …… पासुन कार्यरत असल्याचा पुरावा
४. संस्थेचे मागील वर्षाचा सामाजिक / सांस्कृतिक उपक्रम राबविले बाबत अहवाल व फोटो
५. संस्थेचे मागील ३ वर्षाचे लेखापरीक्षण अहवालाची प्रती
६. संस्थेचे पॅनकार्डची साक्षांकित प्रत
७. संस्थेचे बँकपासबुकची साक्षांकित प्रत
८. संस्थेचे प्रतिज्ञापत्र (अनुदान रक्कम प्राप्त झाल्यानंतर या अनुदानातुन केलेल्या खर्चाचा अहवाल सी.ए. द्वारे प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र UC(Utilization Certificate) पुढील ६ महिन्यात महानगरपालिकेकडे सादर करणेबाबत प्रतिज्ञापत्र)

----------	----------	----------
अध्यक्ष (नावे व स्वाक्षरीसह स्टॅम्प)	चेअरमन (नावे व स्वाक्षरीसह स्टॅम्प)	खजिनदार (नावे व स्वाक्षरीसह स्टॅम्प)